म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय आ०वा०
दा. क्र. ५९८८

IRBK-0103184
IRBK-0103184

ग्रं. सं. ठाणे



# आपले अण्णा

युगवाणीचें कुमार साहित्य : १

# आपले अण्णा



**महर्षि धोंडो केशव कर्वे**

शब्द

व्यं. शं. वकील

[illegible]. ग. गोडसे

IRBK-0103184

१९४८

श्री. वा. वि. भट यांनीं
हें पुस्तक अभिनव प्रकाशन
तर्फे छापून युगवाणी
प्रकाशनसाठीं प्रसिद्ध केलें
१२ त्रिभुवन रोड, मुंबई ४

● आवृत्ति १ ली : १९४८

● किंमत एक रुपया

● सर्वाधिकार सुरक्षित

मुद्रक :
श्री. डी. टी. नाईक
फेमस प्रिंटर्स
१२ त्रिभुवन रोड, मुंबई ४



महर्षि अण्णासाहेब कर्वे हे आपल्या महाराष्ट्राला मिळालेलें अपूर्व वरदान होत. महाराष्ट्रांतल्या मूठभर पुरुषांनींच केवळ ज्ञानाची मिरासदारी ज्या काळांत घेतली होती, त्या काळांतच फुले, आगरकर, कर्वे यांच्यासारखे सत्याग्रही जन्माला आले हेंच आपल्या महाराष्ट्राचें भाग्य. जशी ज्ञानेशानें संस्कृतांत गुप्त असलेली ज्ञानगंगा जनसागराला मिळवली, तसेंच अण्णासाहेबांनीं केलें. अक्षर ओळख देखील नसलेल्या स्त्रियांच्या उद्धारासाठीं त्यांनीं भगीरथ प्रयत्नानें ज्ञानगंगेचा ओघ वळवून घेतला.

या आधुनिक भगीरथाची ही जीवनकथा नवसाक्षरांना आणि कुमारांना बोधप्रद होईल यांत शंका नाहीं. आजच्या नवोदित स्वातंत्र्याच्या काळांत साक्षरता प्रसारासाठीं वाङ्मयाची निर्मिति योग्य दिशेनें व्हायला पाहिजे.

युगवाणी प्रकाशनानें त्या दृष्टीनें हें पाहिलें पाऊल टाकलें आहे. साक्षरतेच्या प्रसारासाठीं केलेला हा प्रारंभ साक्षरता प्रसारासाठीं आपलें जीवनसर्वस्व वेचणाऱ्या थोर पुरुषाच्या चरित्रानेंच होतो आहे.

हा प्रयत्न वाचकांना आवडो आणि सत्कारणीं लागो.

**गो. गुं. गोखले**

# आपले अण्णा  महर्षि कर्वे

जे कोणी रंजले गांजले असतील त्यांना सुख देणें हें संताचें लक्षण होय. संत, महर्षि आणि महापुरुष हे मेण-बत्तीसारखे असतात. मेणबत्ती स्वतः जळते. पण इतरांना प्रकाश देते. दुसऱ्यांवर उपकार करणें हा महापुरुषांचा स्वभाव आणि परोपकारांसाठीं स्वतः संकटांत सांपडणें हा त्यांचा थोरपणा. जनसेवा ही त्यांना देवपूजेसारखी वाटते. महर्षि अण्णासाहेब कर्वे यांनीं अशाप्रकारची देवपूजा आयुष्यभर चालविलेली आहे. आपल्या देवपूजेचें हें व्रत पार पाडतांना त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें. निंदेचे कठोर घाव मस्तकीं सोसावे लागले. पण मुखदुर्बळ अण्णा मनानें मेरु-मांदारा सारखे आहेत. त्यांनीं कच खाल्ली

नाहीं. सारखे ते पुढेंच सरत गेले. अबलांच्या सेवेसाठीं त्यांनीं आपलें आयुष्य अर्पण केलें. त्यांच्या एकनिष्ठ प्रयत्नांचीं मधुर फळें आज महाराष्ट्रामधलि हजारों स्त्रिया चाखीत आहेत.



अण्णांनीं महाराष्ट्रांतील स्त्रियांना विद्यादान करण्याचा संकल्प पन्नास वर्षांपूर्वीं केला. याचें कारण विद्यासंपादन

करण्यासाठीं किती कष्ट पडतात याची खरी जाणीव त्यांना आहे. बाळपणापासूनच अण्णांना विद्येची गोडी लागली. अण्णांचें नांव धोंडू असलें तरी ते अभ्यासांत कांहीं दगड नव्हते. एका मागून एक तीन मुलें अल्पवयांत मेलीं, यामुळें वैतागून अण्णांच्या आईनें आपल्या मुलांचीं नांवें भिकू व धोंडू अशीं ठेविलीं होतीं.

अण्णांचा मूळ गांव मुरुड. आजोळीं शेरवली गांवीं त्यांचा जन्म १८ एप्रील १८५८ रोजीं झाला. पण ते मुरुड हीच आपली जन्मभूमि मानतात. याच मुरुड गांवांत अण्णांनीं शिकायला सुरुवात केली. आधीं ते गांवच्या शेणवी शाळेंत जाऊं लागले. त्या गांवीं सरकारी मराठी शाळा होती. आणि गांव मोठा म्हणून बहुतकरून हुशार मास्तर येत असत. परंतु आधीं थोडी अक्षर ओळख झाल्याशिवाय त्या शाळेंत घेत नसत. या शाळेंत पर- गांवचींहि मुलें मुद्दाम शिकण्यासाठीं येत. पहिलें शिक्षण शेणवी शाळेंत करून घ्यावें आणि मग सरकारी शाळेंत शिकावें अशी वहिवाट होती.

त्या वेळीं आजच्याप्रमाणें पाटी लेखणी नसे. धूळपाटीवर

लिहायला शिकवीत असत. धूळपाटी म्हणजे पाटीवर सारखी धूळ पसरून लांकडाच्या लेखणीनें लिहावें लागत असे. लहानगा धोंडू दररोज सकाळीं शाळेंत जाई.



एकीकडे पाटीवर कित्ता गिरवी आणि तोंडानें भूपाळ्या म्हणे. सगळ्या विद्यार्थ्यांसाठीं शेणवी पंतोजीनें ही शिस्त घालून दिली होती. या शाळेंत सुमारें सहा महिने शिक्षण घेतल्यावर अण्णा सरकारी शाळेंत गेले.

विद्यार्थी हुषार असला तरी कधीं कधीं परीक्षांच्यामुळें त्याच्या मार्गांत अडथळे येत असतात. त्याकाळीं हलक्या

सरकारी नोकऱ्या मिळण्याची लायकी देण्यासाठीं चवथ्या यत्तेची परीक्षा घेत. यांत भाषाविषयाकडे फार लक्ष नसे. कविता तर मुळींच शिकवीत नसत. फक्त गणित आणि मोडी अक्षर ह्यांच्यावर भर देण्यांत येई. गणित हा विषय अण्णांचा आवडता होता. परंतु तरी देखील चवथीची परीक्षा ते नापास झाले. ही परीक्षा घेण्यासाठीं डेप्युटी इन्स्पेक्टर शाळेंत येत असत व पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट मिळे. १८६९ मध्यें वयाच्या अकराव्या वर्षीं अण्णा या परीक्षेंत बसून नापास झाले.

योगायोग असा कीं त्याच वर्षीं ही परीक्षा कायमची बंद करण्यांत आली. तिच्याऐवजीं सहाव्या इयत्तेची परीक्षा सुरू करण्यांत आली. जुनीं क्रमिक पुस्तकें बदलून नवीं आलीं. नव्या पुस्तकांत कठीण कविता दिलेल्या होत्या. अण्णांची उमेद खचली. ही नवी परीक्षा जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं घेण्यांत यावयाची होती. या परीक्षेला बसण्याची अण्णांची इच्छा होती. सुदैवानें मुरुडाला सोमण नांवाचे एक हुषार मास्तर आले. त्यांनीं अण्णांना पुन्हा चवथ्या यत्तेंत घातलें. आपला विद्यार्थी नांवानें धोंडू असला तरी बुद्धीनें बृहस्पति आहे, हें सोमण मास्तरांनीं ओळखलें.

बरेचसे विद्यार्थी मास्तरांच्या घरीं अभ्यासाला आणि झोंपायला जात. त्यांच्याबरोबर अण्णा देखील जात. तेथेंच त्यांचा अमरकोश पाठ झाला.

कालिदास कवीचें रघुवंश नांवाचें संस्कृत महाकाव्य आहे. त्याचे देखील दोन भाग त्यांनीं एका शास्त्रीबोवा-जवळून शिकून घेतले. तरतरीत बुद्धीच्या अण्णानें आपला शाळेंतला अभ्यास लवकरच संपवून टाकला.

त्यांची मराठी इयत्ता संपली तेव्हां जवळच्या दापोली गांवीं एक इंग्रजी शाळा निघाली तेथें शिकायला जावें असें अण्णांना वाटूं लागलें. पण पांच वर्षांहून वडील असलेला भाऊ त्या शाळेंत शिकायला जाऊं लागला.

विद्येकरितां कष्ट सोसावे लागतात. भिकूने चार पांच महिने शाळेंत कसेबसे काढले आणि शेवटीं कंटाळून शाळा सोडून दिली. मग अण्णानें त्या शाळेंत जाण्याचा बेत केला—पण तेव्हां ती शाळाच बंद झाली.

अण्णांना रिकामपणाचा बराच वेळ मिळत असे. त्या वेळांत ते शाळेमधल्या इतर विद्यार्थ्यांना गणित विषय शिकवीत. आपल्या थोरल्या भावाला देखील सहाव्या यत्तेच्या

परीक्षेचा अभ्यास करायला त्यांनीं मदत केली. या सहाव्या यत्तेच्या परीक्षेला बसायला वयाचीं सतरा वर्षें पुरीं व्हावीं लागत. ही परीक्षा जिल्ह्याच्या गांवीं सप्टेंबर महिन्यांत होत असे. मुरुड गांवाहून रत्नागिरी तीस कोस आहे. वाटेंत जागोजाग खाड्या आणि पावसाळ्याचे दिवस. त्यामुळें मुरुडचे विद्यार्थी मुंबईलाच येत असत.

अण्णांच्या बरोबर आणखी चार विद्यार्थी होते. आंजर्ल्याच्या खाडींत मुंबईला जाणारें एक गलबत रात्रीं बारा वाजतां निघणारें होतें. अवशीला रात्रीं भरती येते. त्यामुळें तें रात्रीं निघणार होतें. हे पांचहि सोबती खाडी-जवळच्या धर्मशाळेंत जाऊन बसले इतक्यांत मुसळधार पाऊस पडला आणि गलबत जाण्याचें रद्द झालें. पाय रस्त्यानें मुंबईला जाणें किंवा रत्नागिरीला जाणें सारखेंच जिकिरीचें. खाड्यांना उतार नव्हता नी पावसाला खंड नव्हता. परीक्षा पावसामुळें बुडणार असें सगळ्यांना वाटलें. पण अण्णांनीं हिंमत सोडली नाहीं.

सातारा हें देखील जिल्ह्याचेंच ठिकाण होतें. तेथें जाण्याचें ठरलें. घरच्या वडील माणसांची परवानगी मिळेना


पण मुसळधार पावसांत आपापल्या पडशा खांद्यावर टाकून हे परीक्षेचे यात्रेकरू निघाले. चौपन्न कोसांवर सातारा होतें. दरमजल करीत हे यात्रेकरू परीक्षा देवीला प्रसन्न करायला निघाले. नद्या दुथडया वहात होत्या.

खांद्यावर पडशीचा भार, डोक्यांत विद्येचा भार, आणि वाट चालीला आशेचा आधार. हे पांचहीजण चालून चालून थकले. पाऊस बंद झाला यामुळें मनांत आनंद वाटत होता. पण वेळेवर चार दिवसांत पोंचतां आलें नाहीं तर कसें याची धाकधुक पण वाटत होती.

चिपळूणला ओळखीच्या फौजदारानें एक भाडयाचें तट्टू ओझीं लादण्यासाठीं मिळवून दिलें. ह्या यात्रेकरूंच्या पायांत बळ आलें. पाठीवरचें ओझें हलकें झालें. आतां डोक्यांतलें ओझें हलकें व्हावें अशी त्यांना घाई सुटली. कुंभार्ल्यांचा घाट येवढा बिकट पण हे पांच वीर चपळाईनें चढूं लागले आणि त्यांनीं पाटण गांठलें. पाटणपासून एका खिंडीच्या पाय वाटेनें गेलें तर सहा कोसांचा फेरा वांचणार होता.

दमलेलें तट्टू कसेंबसें एकेक पाऊल टाकीत होतें. एकीकडे उंच कडा, दुसरीकडे खोल दरी, सगळीकडे किर्र

शेवटीं तट्टानें बैठक मारली



झाडी आणि पायाखालीं दोन हाताची अरुंद वाट. काळोख पडला तसा सगळयांचा जीव घाबरून गेला. तट्टानें शेवटीं बैठक मारली. मार मारलें तरी उठेना, तसें त्या मुक्या जीवाला त्यांनीं मागें टाकलें. त्या अंधाऱ्या रात्रीं सर्वजण दैवावर हवाला ठेवून पुढें चालले. मध्यरात्रीं धनगर सड्याच्या माळावर धनगरांकडे पोंचले. चार दोन तास झोंप घेतली. पुन्हां पहांटेला निघाले आणि साताऱ्याला जाऊन पोंह्चले—पण केव्हां ? संध्याकाळीं पांच वाजतां !

अण्णांच्या आशेचा भंग झाला पण पुन्हां थोडी आशा वाटूं लागली. खरी परीक्षा दुसरे दिवशीं सुरू होणार होती. एका मुरुडकरानें त्या परीक्षेच्या यात्रेकरूंना धीर दिला. त्यानें खटपट करून त्यांचीं नांवें नोंदवून घेतलीं पण दुसरे दिवशीं इतर चौघांनाच परीक्षेला बसण्याची परवानगी मिळाली. वयाच्या मानानें अण्णा कर्वे लहान दिसत असे. त्याचें वय पंधरा वर्षांपेक्षां अधिक नाहीं असा परीक्षकांनीं निकाल दिला. परीक्षादेवी अण्णांवर दुसऱ्यांदा रुसून बसली !

“ जें घडतें तें आपल्या बऱ्यासाठीं ” अशी एक समजूत आहे. साताऱ्याहून अण्णा परत आले, आणि

योगायोगानें गांवांतच एक इंग्रजी शाळा निघाली. अण्णांची परीक्षा पास झाली असती तर ते कोठें मराठी शाळेंत मास्तर म्हणून गेले असते. त्यांना इंग्रजी शिकण्याची संधि मिळाली नसती. पण साताऱ्याचा फुकट हेलपाटा मोलाचा ठरला. वयाच्या अठराव्या वर्षी अण्णा ए. बी. सी. डी. शिकूं लागले.

मुंबईच्या रॉबर्ट मनी स्कूल मध्यें अण्णा दाखल झाले. या शाळेंत शिकत असतांना त्यांची नरहरपंत जोशी यांचे बरोबर ओळख झाली. दोघांचा स्नेह जमला. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर दोघांनीं एकत्र बिऱ्हाड केलें.

अण्णा कर्वे आधींच गरीब. त्यांत मुंबईला शिकायला आल्यानंतर चार सहा महिन्यांनीं त्यांचे वडील वारले. कुटुंबाची घडी पुन्हां नव्यानें बसवावी लागली. अण्णांचें लग्न लहान वयांतच झालें होतें. हा संसाराचा भार सांभाळून शिक्षण पार पडणार नाहीं अशी धाकधूक वाटूं लागली. पण वडील बंधु भिकाजीपंत यांनीं घराचा जिम्मा घेतला. मुंबईत कर्वे यांनीं शिकवण्या धरल्या. थोडें फार कर्ज त्यांच्या मामानें दिलें. अण्णांनीं शिष्यवृत्ति मिळवली.

शाळेंतल्या हुशार विद्यार्थ्यांना देखील त्यांची हुषारी पाहून हेवा वाटूं लागला. एकदां तर अण्णांनीं चांगली कॉपी काढल्याबद्दल त्यांना चांगला शेरा मिळाला, हें बघून एका विद्यार्थ्यानें चुगली केली. अण्णांनीं दुसऱ्याच्याकडून कॉपी लिहून घेतली असें सांगितलें. वर्गांत मराठी बोलायचें नाहीं



असा नियम. अण्णांच्या तोंडून ब्रहि निघाला नाहीं. प्रिन्सिपाल जॅक्सन हा कडक शिस्तीचा होता. वयाच्या

एकविसाव्या वर्षीं आपल्यावर छड्या खाण्याचा प्रसंग हकनाहक आला याचें अण्णांना वाईट वाटलें. त्यांनीं कपाळावर हात मारून घेतला नी हात पुढें केला. अण्णांचा निष्पाप चेहेरा नी अगतिकपणाची त्यावर पडलेली छाया पाहातांच जॅक्सन साहेबाला अण्णा निरपराध असावेत असें वाटलें. त्यानें छडी खालीं ठेवून पुन्हा समक्ष कॉपी लिहिण्यास सांगितलें. अण्णांनीं पहिल्याप्रमाणेंच लिहून दाखवली. पुढें दोन वर्षें अण्णा पहिल्या नंबरची शिष्य-वृत्ति मिळवीत होते. मॅट्रिकमध्यें मात्र त्यांना दुसरी तिसरी शिष्यवृत्ति मिळाली. त्यांचा इंग्रजी विषय चांगलासा तयार नव्हता, हें एक त्याचें कारण होय.

उद्योगी अण्णा विद्येबरोबर धनहि मिळवीत होते. इ. स. १८८१ मध्यें शिरगणतीचें काम होतें तें ऐन मॅट्रिक परीक्षेच्या सुमारास करून अण्णांनीं पैसा मिळवला आणि परीक्षा देखील पदरांत पाडून घेतली. शिकवण्या तर ते सुरवाती पासूनच करीत असत. एका गृहस्थाला दर रविवारीं नवनीत वाचून दाखविण्याबद्दल त्यांना महिना आठ आणे मिळत तर ते पुढें बी. ए. झाल्यावर लष्करी अधि-

कार्‍याला एक तास गणित शिकविण्यासाठीं महिना वीस रुपये मिळत.



कर्वे यांच्यावर कुटुंब पोषणाची जबाबदारी इ. स. १८८५ मध्यें विशेषच पडली. तेव्हां ते बी. ए. झाले होते. पण सरकारी नौकरी करायची नाहीं असा त्यांचा निर्धार होता. जमल्यास शिक्षकाची नौकरी करावी असा निश्चय होता. पण कर्वे यांची आंगकाठी अगदींच किरकोळ त्यामुळें त्यांचें तेज पडत नसे. त्यांना एलफिन्स्टन हायस्कुलांत शिक्षक होण्याची संधि होती पण शाळेचे प्रिन्सिपॉल मोडक यांनीं

सांगितलें, " तूं अगदीं लहान दिसतोस. तुला जागा देतां येत नाहीं. "

अण्णांना वाईट वाटलें. पुढें त्यांना ती जागा त्यांच्या गणित शिक्षकाच्या वशिल्यानें मिळाली.

कर्वे यांच्या किरकोळ आंगकाठीचें वैगुण्य पुढें त्यांच्या पुनर्विवाहाच्यावेळीं पंडिता रमाबाईनें काढलें होतें. कर्वे यांची पहिली पत्नी राधाबाई वारली, हें बघून ब-याचशा उपवर मुलींचे बाप अण्णांच्याकडे खेटे घालूं लागले. पण त्यांनीं सगळ्यांना चक्क नकार दिला. आपला पुनर्विवाह करण्याचा निर्धार त्यांनीं जाहीर केला. आई आणि थोरले बंधु यांचें त्यांनीं मन वळवलें. दोघांनींहि अण्णांना परवानगी दिली.

मुंबई सोडून अण्णा नुकतेच पुण्याला आले होते. आगरकर गोखले यांच्या बरोबरीनें फर्ग्युसन कॉलेजमध्यें ते आजन्म सेवक म्हणून काम करूं लागले होते. त्यांना आनंदीबाईचे वडील बाबा यांनी आपल्या विधवा मुलीला पदरांत घेण्याची विनंति केली. तिकडे बाबांनीं आपल्या मुलीचें मन पुनर्विवाहासाठीं वळवलें. आनंदीबाईचें मूळ

नांव गोदूबाई. ती रमाबाईच्या शारदासदनांतली पहिली विधवा विद्यार्थिनी. तिनें रुकार दिला हे कळतांच रमाबाईनें सुचवलें, "निदान एक पावसाळा तरी लोटूं दे!"



कर्व्यांच्या पुनर्विवाहाची बातमी वावटळीप्रमाणें पसरली. मित्रांनीं अभिनंदन केलें पण जुन्या लोकांनीं टीका केली. निंदेचे जहरी घोट कर्व्यांनीं शांत मनानें गिळून घेतले. ११ मार्च १८९३ रोजीं अण्णांचा पुनर्विवाह झाला. या पुनर्विवाहामुळें अण्णांना आपल्या घराशीं असलेला संबंध तोडावा लागला.

दर मे महिन्यांत मुरुडला महिना पंधरा दिवस रहाण्याची अण्णांची वहिवाट होती. त्याप्रमाणें ते आपल्या पत्नीला घेऊन गेले. पुनर्विवाहाच्या वेळीं कविता म्हणून शारदासदनामधल्या मुलींनीं त्यांची गोड गळ्यावर स्तुति केलेली होती. आगरकरांसारख्या देवमाणसानें त्यांचा सत्कार केला होता.

59758



पण मुरुडमधल्या बायकामुली आपापल्या उंबरठ्यावर उभें राहून या जोडप्याची टवाळी करीत होत्या. मुरुडांतला ब्राह्मणवृंद एकत्र जमून गांवकी करण्याचा बेत ठरवूं लागला. अण्णांवर बहिष्कार घालण्याचें ठरलें. इतकेंच नव्हे तर पुन्हां त्यांनीं गांवांत पाऊल ठेवल्यास त्यांचे थोरले बंधु भिकाजीपंत यांच्यावरहि बहिष्कार घालावा असें ठरलें.


सगळीकडून मोहोळ उठलें म्हणजे माणूस गांगरून जातो, पण अण्णांनीं मात्र धीर सोडला नाहीं. कांहीं वर्षें त्यांनीं मुरुडाला जाणेंच सोडून दिलें.

पुनर्विवाह झाल्यावर अण्णा आणि आनंदीबाई यांच्याबद्दल वाटेल त्या अफवा लोकांनीं पसरून दिल्या. पण दोघेंहि डगमगले नाहींत. कालांतरानें गैरसमज नष्ट झाले. आनंदीबाईचे वडील एकदां जांवई आणि लेक यांना भेटायला आले तेव्हां त्यांच्या मांडीवर अचानक नातू येऊन बसला, तेव्हां गहिंवर येऊन ते म्हणाले, “रामा, तुझें हें स्वरूप दिसेल असें वाटले तरी कां रे!”

आतां पुनर्विवाहाबद्दल कोणालाहि येवढा बाऊ वाटत नाहीं.

पण पन्नास वर्षांपूर्वी तसें नव्हतें. समाजाशीं वैर धरून या गोष्टी कराव्या लागत. त्याला लागणारें धैर्य अण्णा यांनीं दाखवलें यांतच त्यांची थोरवी आहे.

पुनर्विवाहाच्यासंबंधीं अनुकूल मत करून घेण्यासाठीं अण्णांनीं दौरा काढला. पण खरी अनुकूलता मिळाली ती प्लेगनंतर. प्लेगोबानें आपलें उग्रस्वरूप दाखवलें त्यामुळें अनेक बालिका विधवा झाल्या. अण्णांनीं याच सुमाराला म्हणजे १८९९ च्या जानेवारी पहिलीला अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली.



अनाथ बालिकाश्रमाची सुरुवात पुणें शहरांत झाली, पण लवकरच बाहेर एक मातीची झोंपडी बांधून तेथें आश्रम नेला. ह्या आश्रमाची कल्पना अण्णांच्या मनांत बरेच दिवस घोळत होती. त्याच्यासाठीं त्यांनीं वर्गणी देखील गोळा

करण्याचा प्रयत्न केला, पण पदरांत निराशा मात्र पडली. शेवटीं स्वतःचे एक हजार रुपये देऊन त्यांनीं कामाला सुरुवात केली. प्रत्येकीं एका विधवेचा खर्च करायला कबूल होणारे दोन दाते मिळाले. तीनशें रुपये वर्गणी जमली. १८९८ साल अखेर सुमारें दहा हजार रुपये जमले आणि आश्रमाला प्रारंभ झाला. सुरवातीच्यावेळीं एकच विधवा होती. पांचव्या वर्षाच्या शेवटीं एकीच्या एकवीस झाल्या.

आश्रम अगदीं गांवाबाहेर होता. आजहि तो तेथेंच आहे. पण आतां त्या मूळ झोंपडीवजा आश्रमाची वेल विस्तारली आहे. तेथला चिखल, खडे आणि बाभळीचे काटे गेले, आतां तेथें मखमलीसारखी हिरवळ, पत्री आणि फुलें आहेत. ह्या आश्रमाच्या वेलविस्तारांत अण्णांना त्यांच्या पहिल्या कुटुंबाची बहीण आणि आनंदीबाई या दोघींची खूपच मदत झाली. लवकरच त्यांना पार्वतीबाई आठवले (आनंदीबाईंची बहीण) येऊन मिळाल्या. वयाचीं पंचवीस वर्षें निरक्षर स्थितींत घालवून त्या आश्रमांत दाखल झाल्या. आल्या-दिवसापासून शिकूं लागल्या व कष्टानें अभ्यास करून

सरकारी ट्रेनिंगची परीक्षा चांगल्या रीतीनें पास झाल्या. आश्रमाची सगळी व्यवस्था बघण्याचें काम त्यांनीं घेतलें. हळूं हळूं आश्रमाला अनेक कार्यकर्त्या स्त्रियांचा लाभ झाला. जनतेचा लोभ देखील वाढत चालला.

निंदा करणारे देखील कांहीं कमी नव्हते. कधीं कधीं एखादी गैरवर्तणूक करणारी विद्यार्थिनी आली तर तिला शिक्षा देखील करावी लागे. बारीक सारीक चोऱ्या करणाऱ्या एका मुलीला शिक्षा करण्यांत आली. लागलीच तिच्या पालकानें मुलगी काढून घेतली आणि तिची बदनामी केल्याचें कुभांड रचलें. पण असे अपवाद फार थोडे. आश्रमामुळें स्त्रियांचा फायदा झाला हेंच खरें. पस्तीस वर्षांची आजी वीस वर्षांची आई आणि सहा वर्षांची मुलगी या तिघींचें एक कुटुंब आश्रमांत राहायला आलें. आजीनें लिहिणें वाचणें शिकून पुढें सुईणीचें सर्टिफिकेट मिळवलें व ती आपल्या पायावर उभी राहिली. आईनें इंग्रजी शिकून पुढें पुनर्विवाह केला. मुलगी आतां बी. ए. झाली असून तिचें एका इंजिनियरबरोबर लग्न झालें आहे. अशीं कितीतरी उदाहरणें सांपडतील.

बालिकाश्रमाच्या कल्पनेंतून अण्णांना महिला विद्यालयाची कल्पना सुचली. रत्नागिरीच्या एका गृहस्थानें आपली चौदा वर्षांची विधवा मुलगी आश्रमांत घेण्याबद्दल पत्र लिहिलें. त्याच पत्रांत बारा आणि दहा वर्षांच्या दोन कुमारिका मुलींना घेण्याबद्दल विनंति केली होती. त्यांनाहि आश्रमांत घेण्यांत आलें.

आश्रमांत सुवासिनी देखील येत. या सगळ्या विद्यार्थिनीं-साठीं एक शाळा काढावी असा विचार अण्णांनीं योजिला; पण आश्रमाच्या कार्यकारी मंडळानें वाटल्यास कर्वे यांनीं त्यासाठीं दुसरी संस्था काढावी असा निर्णय दिला. आणि ४ मार्च १९०७ रोजीं सहा विद्यार्थिनींसह अण्णांचें महिला विद्यालय स्थापन झालें.

महिला विद्यालयाचें पाऊल हळूं हळूं पुढें पडूं लागलें. चार वर्षांनीं आश्रमाशेजारींच विद्यालयासाठीं जागा खरेदी केली. आणखी दोन वर्षांनीं इमारत बांधून तेथें विद्यालय गेलें.

अण्णांनीं मुलांच्या शाळेंत विद्यालयांतल्या प्रौढ मुली शिकायला पाठवणें सुरू केलें. सहशिक्षणाचा हा नवा प्रयोग होता. पुण्यांत मुलींची वेगळी शाळा होती. पण

त्यांत शिस्तीच्या नांवाखालीं भलतेच अमानुष प्रकार घडत. तो काळ स्त्रियांना शिक्षण घेण्यासाठीं उत्तेजन देण्याचा होता. पण शाळेची हेडमास्तरीण उलट वागे. पहिल्या वर्षी मुलीला मॅट्रिकच्या परीक्षेला बसूं देणें तिला ठीक वाटत नसे! दोन दोन वर्षे मुलींना त्याच त्या वर्गांत बसवणें ती शहाणपणाचें समजे. एका मुलीच्या बाबतींत तर तिनें भयंकर अन्याय केला. प्लेगामुळें सगळ्या मुली आपापल्या गांवीं गेल्या. शाळा बंद झाली पण या मुलीला परीक्षेचा फॉर्म पाहिजे होता. हेडमास्तरिणीनें कळवलें कीं कुठल्यातरी शाळेची चांचणी परीक्षा पास झाल्याचा दाखला आण. तें शक्य झालें नाहीं. पालकानें खटपट केली. युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्याला कळवलें. त्यांनीं परीक्षेला बसूं देण्याचें कबूल केलें परंतु निकाल मात्र नियमाप्रमाणें सांगतां येणार नाहीं असें सांगितलें. मुलगी परीक्षेला बसली, पासहि झाली; परंतु हेडमास्तरणीनें अनुमति दिली नाहीं म्हणून तिला पास केल्याचें जाहीर करतां आलें नाहीं.

यामुळेंच अण्णांनीं हा नवा मार्ग पत्करला.

महिला विद्यालयाची जबाबदारी अण्णांनीं घेतली आणि ती त्यांच्यापासून निष्काम कर्म मठाच्या सेवकांनीं मागून घेतली. अण्णा ह्या मठाचे संस्थापक. प्रारंभीं या मठाचे सेवक सेविका एकूण बारा चौदाच होते. या मठाचा उद्देश मनांत कोणताहि स्वार्थ न ठेवतां परोपकाराचीं कामें करणें हा होता. अण्णांना परोपकाराचें बाळकडू मिळालें होतें. लहानपणीं गांवांत त्यांनीं एका सहकारी दुकानाच्या तुटीचें ओझें असेंच आपल्या आंगावर घेतलें होतें. शिकवण्या शिष्य-वृत्त्या यांतून रुपयाला एक पैसा ते परोपकारासाठीं काढून ठेवीत असत.

या मठाच्या सेवकांनीं प्रसंग पडल्यास धान्य भिक्षेवर आपला निर्वाह करावा आणि लोकसेवा करावी असें ठरलें. लहान-पणीं बडोद्याच्या महाराजांनीं दर ब्राह्मणाला देऊं केलेली दक्षिणा अण्णांनीं घेण्याचें मनांत आणलें पण त्यावेळीं त्याच्या आईनें आपल्या थोर घराण्याची आठवण दिली. वडील वारल्यानंतर मुंबईला अण्णांनीं वार लावावे ही सूचना सर्वांनाच अपमानास्पद वाटली होती. पण ही निष्काम कर्म मठ सेवकांची सूचना स्वार्थासाठीं नव्हती.

कांहीं काळ हें धान्य भिक्षेचें कार्य चाललें पण मग लवकरच तें बंद झालें.

संस्था स्थापन करणारे केवळ पैशाच्या दृष्टीनें स्वार्थत्यागी असून चालत नाहीं. अहंकार, स्वतःच्या मताचा फाजील अभिमान, दुसऱ्यांच्या मताची हेटाळणी यामुळें सहकार्य व्हावें तसें होत नाहीं. त्यामुळें एक संस्थेचें काम चालावें तसें चालत नाहीं. खांद्याला खांदा देणारे टिळक आगरकर एकमेकांना सोडून गेले हा इतिहास अण्णांना माहित होता.

अनाथ बालिकाश्रमाचें निराळें बोर्डिंग, महिला विद्यालयाचें निराळें. दोन्हीं संस्थांवर कांहीं खर्च वेगळा पडे. अण्णांनीं त्यांचा मिलाफ घडवून आणला. मठ देखील त्यांत सामील झाला. या त्रिवेणी संगमामधून अण्णांनीं महिलाश्रम निर्माण केला.

महिलाश्रमाच्या या कार्याला आजन्म वाहून घेण्यासाठीं अनेक थोर स्त्रीपुरुष पुढें अण्णांना येऊन मिळाले. पण त्या आधींच स्त्रियांचें एक स्वतंत्र विद्यापीठ असावें अशी अण्णांची कल्पना होती. जपानमध्यें केवळ स्त्रियांसाठीं एक वेगळें विद्यापीठ होतें. त्यामुळें तर त्यांच्या विचारांचीं

चक्रें अधिकच जोरानें फिरूं लागलीं. हिंगण्याच्या माळावर संसारांत पडूं इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठीं वेगळा शिक्षणक्रम असलेलें नमुनेदार विद्यापीठ स्थापन करण्याची त्यांची इच्छा होती. परकी इंग्रजी भाषेचा सासुरवास प्रत्येक विषय शिकतांना विद्यार्थिनी सहन करीत. त्यामुळें त्यांचें शिक्षण धड होईना. शिवाय स्वयंपाकशास्त्र, बालसंगोपन, गृहव्यवस्था, प्रसूतिशास्त्र, शुश्रूषाशास्त्र असे विषय स्त्रियांना अवश्य यावेत असें त्यांना वाटत होतें.

हे त्यांचे विचार पूर्वींपासून होते. म्हणूनच पुनर्विवाह झाल्यावर त्यांनीं आपली पत्नी आनंदीबाई हिला सूतिकाशास्त्राचें शिक्षण ताबडतोब दिलें. संसारदक्ष गृहिणी निर्माण करणारें विद्यापीठ स्थापन करण्याचे प्रयत्न शेवटीं यशस्वी झाले.

१९१५ सालीं मुंबईला कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. त्याच्याच बरोबर सामाजिक परिषद भरली. या परिषदेचें अध्यक्षस्थान अण्णासाहेब कर्वे यांना देण्यांत आलें. अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत त्यांनीं ही कल्पना बोलून दाखविली. लागलीच त्या कल्पनेला पाठिंबा देणारी एक देणगी

मिळाली. महिलाश्रमाचे आजन्म सेवक गाडगीळ यांनीं वडिलार्जित धनामधून दहा वर्षें दरसाल एक हजार याप्रमाणें देणगी देण्याचें कबूल केलें. हिंगण्याला पहिलें कॉलेज काढण्यासाठीं हा पैसा खर्च करावयाचा होता. पुढें लागलीच दुसरी चार हजारांची देणगी मिळाली. पुढाऱ्यांचा पाठिंबाहि मिळाला.

१३ फेब्रुवारी १९१६ ला भारतीय महिला विद्यापीठ स्थापन करण्यासाठीं तात्पुरतें मंडळ नेमण्यांत आलें. महात्मा गांधी यांना ही विद्यापीठाची कल्पना मान्य झाली. पण त्यांत इंग्रजी हा विषय आवश्यक असूं नये असा त्यांनीं आग्रह धरला. पण कर्वे यांनीं तसें करण्याचें नाकारलें. आधींच रँग्लर परांजपे, नटराजन् वगैरे समाजसुधारक या कल्पनेला विरोध करीत होते. त्यांना देखील सांभाळून घ्यायचें होतें. शेवटीं महात्मा गांधी यांनीं आपला आग्रह मागें घेतला. युरोपांतील ज्ञान अवगत करून घेण्यासाठीं इंग्रजीची आवश्यकता आहे, हें अण्णांचें म्हणणें होतें. महात्मा गांधी यानीं आपला नैतिक पाठिंबा विद्यापीठाला दिला. त्यांच्या अध्यक्षतेखालीं अमदाबाद येथें अण्णांचें विद्यापीठासंबंधीं व्याख्यान झालें.

विद्यापीठाच्या कल्पनेला विरोध करणारे रँग्लर परांजपे हे विद्यापीठाचे पहिले उपकुलगुरू झाले. कुलगुरु डॉ. भांडारकर झाले. अशा रीतीनें ३ जून १९१६ रोजीं विद्यापीठाला वेगळें अस्तित्व प्राप्त झालें.

महिला विद्यापीठ स्थापन झालें. महिलाश्रमांतल्या पहिल्या चार विद्यार्थिनी ता. २६ जून १९१६ ला झालेल्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेला बसल्या आणि पास झाल्या. लागलीच कॉलेजचा पहिला वर्ग निघाला. ह्या चार विद्यार्थिनींबरोबर मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिक झालेली आणखी एक मुलगी दाखल झाली. महिलाश्रम, महिला पाठशाळा आणि अध्यापिका शाळा अशा संस्थांनीं विद्यापीठाला टुमदार स्वरूप प्राप्त झालें, विद्यापीठाला जोडून शाळा काढण्याचे प्रयत्न सुरू झाले आणि पुणें शहरांत कन्याशाळा निघाली. पुढें महाराष्ट्रांतल्या प्रमुख शहरीं कन्याशाळा काढण्याचा उद्योग कर्व्यांनीं आरंभला. पण खरें यश सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं आपली पंधरा लक्षाची देणगी दिल्यावरच मिळालें. ठाकरसी यांच्या देणगीमुळें विद्यापीठाला भव्यता प्राप्त झाली.

ही देणगी देखील एका योगायोगामुळें विद्यापीठाला मिळाली. विद्यापीठ सुरू झालें तेव्हां सर विठ्ठलदास यांनीं एक हजाराची देणगी दिली होती. पण त्यावेळीं त्यांना देखील या विद्यापीठाला दरसाल साडेबावन्न हजाराची देणगी देऊं असें वाटलें नव्हतें. सर विठ्ठलदास हे आपल्या स्नेही मंडळासह जगप्रवासाला निघाले. त्यांना आपल्या पत्नीला सोबत म्हणून एक सहचरी हवी होती. आश्रमांतली एखादी इंग्रजी जाणणारी विद्यार्थिनी पाठविण्याबद्दल विनंति करण्यांत आली. तेव्हां अण्णांनीं सीताबाई अण्णिगेरी या विद्यार्थिनीची निवड केली. प्रवासांत असतांना जपानमधलें स्त्रियांचें विद्यापीठ सर साहेबांनीं पाहिलें. तेथलें स्त्रियांचें स्वावलंबी शिक्षण बघून त्यांच्या मनावर परिणाम झाला. सीताबाईंनीं या संधीचा फायदा घेतला आणि महिलाविद्यापीठाबद्दल सर साहेबांना माहिती दिली.

सीताबाईंचा सुस्वभाव आणि सुगरणपणा यांचा लेडी ठाकरसी यांच्या मनावर चांगला परिणाम झाला. अण्णांच्या महिला विद्यापीठांतल्या विद्यार्थिनींचा आणि आजन्म सेविकांचा सीताबाईंच्या स्वरूपांत त्यांना परिचय झाला. सर विठ्ठलदास

यांनीं महिला विद्यापीठाला भरीव देणगी देण्याचा विचार कायम केला. हिंदुस्थानांत ज्या दिवशीं त्यांनीं पाय ठेवला त्याच दिवशीं अण्णा सीताबाईना घेण्यासाठीं बोटीवर गेले होते तेव्हां ठाकरसींनीं त्यांना दुपारीं भेटीला बोलावलें.

लवकरच पुढचें बोलणें होऊन सर विठ्ठलदास यांच्या मातुश्रीचें नांव भारतीय महिला विद्यापीठाला जोडण्यांत आलें. हिंगण्याचें कॉलेज व पुण्याची कन्याशाळा या संस्था विद्यापीठाच्या ताब्यांत देण्यांत आल्या. मुंबईला एक नवीन कन्याशाळा व नवें कॉलेज काढण्यांत आलें. या देणगीनें विद्यापीठाला प्रतिष्ठेबरोबरच पैशाचीहि जोड मिळाली.

शहरोशहरीं विद्यापीठाला जोडून कन्याशाळा स्थापन करणें सुरू झालें. कमलाबाई देशपांडे, सीताबाई अण्णिगेरी, बनुताई अहो यांच्यासारख्या आजन्म सेविका आणि वामन मल्हार जोशी, चिपळूणकर, मायदेव, यांच्यासारखे आजन्म सेवक यांनीं अण्णासाहेबांच्या कर्तबगारीला कोंदण घालून अधिकच शोभा आणली.

विद्यापीठाच्या पदवीधर स्त्रियांतून लेखिका, राष्ट्रसेविका आणि समाजसेविकांची एक परंपरा निर्माण झाली.

अण्णांनीं येवढ्यावरच समाधान मानलें नाहीं. स्त्रीशिक्षणाचा फायदा शहरांतल्या लोकांनीं घेतला. पण खेडोपाडीं निरक्षर पुरुषांची खूप संख्या आहे. त्यांना साक्षर करण्याचें कार्य जागोजागीं कांहीं देशसेवक करीत होते. अण्णांनीं देखील याबाबतींत फार प्रयत्न केले. त्यांनीं महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना केली. ते वर्गणीसाठीं घरोघर हिंडले. आज त्या मंडळाच्या पन्नासपर्यंत प्राथमिक शाळा आहेत.

अण्णांनीं खूप प्रवास केला. ते हिंदुस्थानभर हिंडले. यूरोप आणि आफ्रिकेंतदेखील जाऊन आले. म्हातारपणामुळें मन संकुचित होतें असें म्हणतात, पण आधींच कनवाळू असलेलें त्यांचें मन अधिक उदार होत आहे.

जगांत समता नांदावी, सगळे ममतेनें रहावेत असें त्यांना वाटतें. यासाठींच त्यांनीं १९४४ मध्यें समता संघाची स्थापना केली. अण्णांचें समता संघाचें ध्येय हेंच सगळ्या साधुपुरुषांचें ध्येय होतें. तुकारामाचें हेंच ध्येय होतें, महात्मा गांधींचें हेंच ध्येय होतें.

अण्णांना महर्षि ही पदवी जनतेनें दिलेली आहे ती अगदीं

योग्य आहे. ऋषि हा तप करतो, स्वतः कष्ट भोगून देवा-पासून वर मागून घेतो. अण्णांनीं स्त्रीशिक्षणाचा पहिला वर मागून घेतला, अनाथ स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभें केलें. अण्णांनीं दुसरा वर मागून घेतला, निरक्षर खेडूतांना साक्षरतेची वाट दाखविली. आतां तिसरा वर मिळविण्यासाठीं अण्णांनीं तप सुरू केलें आहे.

महर्षि अण्णा शंभर वर्षें जगोत. जगांत समतेचें राज्य झालेलें पाहोत. पहिल्या स्वातंत्र्य युद्धाच्या वेळीं जन्म झालेले अण्णा स्वतंत्र भारताचे नागरिक झाले. अण्णा आतां समतेचे पाईक बनलेले आहेत. ते उद्यां समतेच्या आधारावर अस्तित्वांत येणाऱ्या नव्या जगाचे नागरिक बनोत. "याच देहीं, याच डोळां" अण्णांना तें भाग्य लाभावें अशीच आपण सगळे प्रार्थना करूं या.

---

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# मुलांच्यासाठीं प्रकाशनाच्या मार्गावर युगवाणी साहित्य

●

सूत्रधार

इसापचा नवा अवतार

बाळू

अशोक नी अमीन

पुराणांतील वांगीं

IRBK-0103184

IRBK-0103184

# युगवाणी प्रकाशन

१२ त्रिभुवन रोड, मुंबई ४

## आमचें प्रकाशित साहित्य

★ **कांहीं कविता** किंमत १॥ रुपया
बा. सी. मर्ढेकर यांच्या आधुनिक कवितांचा संग्रह

★ **तिसरें सत्य** किंमत ३ रुपये
व्यं. शं. वकील यांच्या कौटुंबिक व राजकीय गोष्टींचा संग्रह

★ **पहिली सलामी** किंमत ३ रुपये
प. त्रिं. सहस्रबुद्धे यांची वारली जीवनावरील राजकीय कादंबरी

★ **सोव्हिएट दर्शन** किंमत २ रुपये
प्रि. वा. य. कोल्हटकर, प्रा. अ. रा. कामत, डॉ. दांडेकर, श्री. के. ना. काळे प्रभृतींचे माहितीपूर्ण लेख

★ **आदर्श कुलस्वामिनी** किंमत १ रुपया
लेडी चंदावरकर यांचें चरित्र व आठवणी